# Washim District Police

**Nature of Work** :- **Helping women in distress situation**

**Police Station** :- **Mangrulpir**

**Date of Good Work done** :- **24/05/2022**

**Brief of the work done :-**

पोलीस स्टेशन मंगरूळपीर येथे दाखल अल्पवयीन मुलीवरील अत्याचार प्रकरणातील आरोपीस पॉस्को कायद्यांतर्गत '10 वर्षे कारावासा'ची शिक्षा झाली आहे. पॉस्को गुन्ह्यांमध्ये आरोपीला कडक शिक्षा होण्यासाठी वाशीम पोलीस दल प्रयत्नशील आहे.

## अल्पवयीन मुलीस गर्भवती करणाऱ्या नराधमास १० वर्ष सश्रम कारावास

**➢ धमकी देवुन अनेकवेळा केला लैंगिक अत्याचार**

**➢ डिएनए चाचणीच्या अहवालावरुन आरोप सिध्द**




देशोन्नती वृत्तसंकलन...

**वाशिम ■** आजोबांसाठी शेतात शिदोरी घेवुन जाणाऱ्या १४ वर्षी गतीमंद अल्पवयीन मुलीला अडवून जोरजबरदस्तीने तिचेवर अतिप्रसंग करणाऱ्या व त्यानंतर अनेक वेळा लैंगिक अत्याचार करुन तिला गर्भवती करणाऱ्या ५२ वर्षीय नराधमास मंगरुळपीर येथील जिल्हा व सत्र न्यायाधिश डॉ. रचना तेहरा यांनी आज दिलेल्या निकालात १० वर्षे सश्रम कारावास व ५००० रुपये दंडाची शिक्षा ठोठावली.

मंगरुळपीर तालुक्यातील एका गावात एक १४ वर्षीय गतीमंद मुलगी आजी आजोबांसोबत राहत होती. तिचे आई-वडील व भाऊ मोलमजुरीकरिता मुंबई येथे होते. हि मुलगी दररोज आजोबांना शेतात शिदोरी घेवुन जात होती. १२ मार्च २०१७ रोजी शेतात शिदोरी घेवून जात असतांना प्रकाश लालसिंग चव्हाण (वय ५२) याने तिला अडवून जबरीने तिच्यावर लैंगिक अत्याचार केला. त्यानंतर प्रकाश चव्हाण या नराधमाने याबाबत कुणाला सांगितल्यास तुला जिवे मारेन अशी धमकी देवून अनेक वेळा लैंगिक अत्याचार केला. काही दिवसांनी आजी व आईला मुलीचे पोट वरती आल्यासारखे दिसल्याने त्यांनी तिला विश्वासात घेवून विचारणा केली. यावेळी पिडीतेने घडलेला सर्व प्रकार आईला सांगितला. या संदर्भात आईने आरोपी प्रकाश लालसिंग चव्हाण विरुध्द मंगरुळपीर पोलीस स्टेशनला तक्रार दाखल केली. या तक्रारीवरुन आरोपी नराधमाविरुध्द भादंवीचे कलम ३७६(२) व कलम ३,४,५ बाल लैंगिक अत्याचार संरक्षण कायदा पोस्को अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला.

या प्रकरणात आरोपी पिडीता व पिडीतेला झालेल्या बाळाचे रक्त नमुने प्रादेशिक न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा, डिएनए विभाग नागपूर येथे तपासणीकरिता पाठविण्यात आले. सदर डिएनए अहवाल जुळून आल्याने या तपासणीच्या अहवालावरुन नराधमा विरुध्दचा आरोप सिध्द झाला. या प्रकरणाचा तपास पुर्ण करुन मंगरुळपीर येथील न्यायालयात दोषारोप पत्र दाखल करण्यात आले.

या खटल्यात आरोपी, पिडीता व पिडीतेला झालेल्या बाळाचे रक्त नमुने प्रादेशिक न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा, डिएनए विभाग नागपूर येथे तपासणीकरिता पाठविण्यात आले होते. सदर डिएनए अहवाल जुळून आल्याने या तपासणीच्या अहवाला वरुन प्रकाश चव्हाण या नराधमा विरुध्दचा आरोप सिध्द झाला.

या खटल्यात सरकार पक्षातर्फे १९ साक्षिदार तपासण्यात आले. साक्ष व पुराव्यावरुन तसेच पिडीतेची वैद्यकिय तपासणी आरोपी व पिडीतीचे डिएनए तपासणीकरिता पाठविलेले नमुने तसेच अन्य पुराव्यावरुन आरोपी विरुध्द गुन्हा सिध्द झाल्याने विद्यमान जिल्हा व सत्र न्यायाधिश डॉ. रचना तेहरा यांनी आरोपीस भादंविचे कलम ३७६(२) व कलम ३,४,५ बाल लैंगिक अत्याचार संरक्षण कायदा पोस्को अंतर्गत १० वर्षे सश्रम कारावास, ५००० रुपये दंड व दंड न भरल्यास अधिक ६ महिणे सश्रम कारावास तसेच कलम ५०६ मध्ये १ वर्षे कारावास व ५०० रुपये दंड अशी शिक्षा ठोठावली. या खटल्यात सरकार पक्षाच्यावतीने सहाय्यक सरकारी अभियोक्ता पुरुषोत्तम एस. ढोबळे यांनी काम पाहीले. (ना.प्र.)